ठाणे वृत्तान्त
THE EXPRESS GROUP
मंगळवार, २ जून २००९

# रोहित-सोनल मोरे यांची रेल्वे बॅडमिंटन संघात निवड



ठाणे : येन स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या रोहित आणि सोनल मोरे या भाऊ-बहिणीची ओलोमाऊ (झेक प्रजासत्ताक) येथे होणाऱ्या सहाव्या जागतिक रेल्वे अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

रेल्वेच्या संघातून खेळणारा रोहित यावर्षीच्या राष्ट्रीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत सांघिक लढतीत उपविजेता ठरला होता, तर सोनलने वरिष्ठ गटाच्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते. रोहित आणि सोनल दोघेही प्रथमच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत आहेत. रोहित आणि सोनल दोघे राजीव गणपुले आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेता अमरिश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटनचा सराव करतात.